महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.०९/२६५४७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक: १०.१०.२०२२**

# परिपत्रक

**विषय: महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त झालेले/ होणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम रकमेबाबत.**

तत्कालीन म.रा.वि.मंडळ व तद्नंतर महावितरण कंपनी अंतर्गत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भ.नि.नि.विश्वस्त मंडळाच्या कार्यालयामध्ये संकलित करण्यात येवून अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीनंतर सदरची रक्कम त्यांना अदा करण्यात येते. भ.नि.नि.विश्वस्त मंडळाच्या सध्याच्या कार्यपध्दतीनुसार सेवानिवृत्तीनंतर तीन वर्षापर्यन्त सदरच्या रक्कमेवर व्याज देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. म.रा.वि.मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ यांचे पत्र क्र.एडी/पीएफ/आयएनडीयू/डी-३२३ दि.०३.०८.२०२२ नुसार महावितरण कंपनीतून सेवानिवृत्त होणारे बरेच अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत त्यांची अंतिम भ.नि.नि.ची शिल्लक रक्कमेची उचल वेळेत केली जात नसल्याचे कळविले आहे.

२. सदर बाबतीत महावितरण कंपनीतील जे अधिकारी व कर्मचारी यापूर्वीच सेवानिवृत्त झालेले आहेत व ज्यांनी भ.नि.नि. च्या अंतिम प्रदान रक्कमेचा दावा केलेला नाही, अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ताबडतोब ऑनलाइन अंतिम भ.नि.नि. चा नमुना (Form) भरुन संपूर्ण दस्ताऐवजा सोबत भ.नि.नि.विश्वस्त मंडळाकडे सादर करावा जेणेकरुन त्यांची रक्कम वेळेत अदा केली जाईल. अशा अधिकारी व कर्मचारी यांना किंवा त्यांच्या वारसास संबंधीत कार्यालयाने भ्रमणध्वनी लघुसंदेशाद्वारे (SMS) व पत्राद्वारे याबाबत अवगत करावे.

३. कंपनीच्या सेवेतून जे अधिकारी व कर्मचारी भविष्यात ज्या महिन्यात सेवानिवृत्त होणार आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांनी त्याच महिन्यात ऑनलाइन अंतिम भ.नि.नि.चा नमुना (Form) संपूर्ण दस्ताऐवजा सोबत भ.नि.नि.विश्वस्त मंडळाकडे सादर करावा. सर्व प्रशासकीय कार्यालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्ती प्रकरणी सदर नमुना (Form) वेळेत भरला जाईल याची खात्री करावी.

४. सदरचे परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(अ.प्र.भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.